# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 19/01/2022 (बुधवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत मौजा कळमना शिवार येथे दिनांक 17/01/2022 चे 24.00 वा. 18/01/2022 चे 08.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने कळमना गावातील एजी पंप रोहीत्रावरून लघुदाब वाहीनीचे ॲल्युमिनीअम तार एकुन 10 गाळयाचे ॲल्युमिनीअम तार अंदाजे 2 किमी कि. 57,120/—रू. चा तार तसेच एकुण 5 सिमेंटचे पोलचे तोडुन नुकसान केले आहे. अज्ञात आरोपीतांनी महावितरण कंपनीचे अंदाजे 57,120/—रू. चे लघुदाब वाहीनीचे ॲल्युमिनीअम तार चोरून आर्थिक नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गिरीश रविशंकर मडामे वय 33 वर्ष रा.बालाजी नगर उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 427 भादंवि. सहकलम 136 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा जाधव मो.नं. 7774074963 या करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 06 कि. मी. अंतरावरील मौजा आदासा पडोळे किराणा दुकाणा समोर येथे दिनांक 18/01/2022 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रशांत वासुदेव चौहान वय 35 वर्ष रा. वार्ड नं 3 सोनपुर आदासा ता. कळमेश्वर व आरोपी क्र. 1) रामदास सिताराम गजभारे यांचे नाश्ता व झुणकाभाकर चे दुकान हे गणपती देवस्थाण आदासा मंदिर येथील फॉरेस्ट च्या मोकळया जागेवर एकमेकांचे शेजारी आहे. आरोपी क्र. 1 याने फिर्यादिचे दुकानाचे लाकडी बल्लीला हिरवी नेट व दोर बांधला होता फिर्यादी यांनी आरोपी क्र. 1 यास हटकले असता त्याने फिर्यादी सोबत वादविवाद करून शिवीगाळ केली. फिर्यादी मोटरसायकलने आदासा येथील किराणा दुकानात जात असता पडोळे किराणाजवळ आदासा येथे यातील आरोपी क्र. 1 याने फिर्यादिस गोटा फेकुण मारला तो गोटा फिर्यादिचे डावे हाताचे ढोपराला लागल्याने फिर्यादि हे मोटर सायकलसह खाली पडले. यानंतर आरोपी क्र. 1 व 2) रोहीदास सिताराम गजभारे, दोन्ही रा. सोनपुर आदासा ता. कळमेश्वर यांनी संगणमत करून फिर्यादिस हातबुक्कीने मारहाण करून मर्डर करन्याची धमकी दिली. फिर्यादिस मारहाण केल्याने त्याचे डावे हाताला ढोपराजवळ मार लागल्याने डॉक्टरांनी फॅक्चर असल्याचे लेखी रिपोर्ट दिल्याने तसेच फिर्यादिचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 326,504,506,34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश पाटील मो. नं. 8805253982 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर